नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०४/२०२५ (बुधवार)**

---

## मा. मुख्यमंत्री यांच्या १०० दिवसांच्या उपक्रमाअंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्हया मध्ये अवैध अंमली पदार्थ तस्करी विरोधात राबविण्यात आली विशेष मोहीम

दिनांक ०१/०३/२०२५ रोजी ठाणे शहरात झालेल्या गुन्हेगारी आढावा बैठकीत महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार, अंमली पदार्थांची तस्करी आणि वाढत्या सेवनाला आळा बसण्यासाठी संपूर्ण नागपूर ग्रामीण जिल्हयात विशेष कारवाई मोहीम राबविण्यात आली.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी अंमली पदार्थ विरोधी कारवाई विशेष मोहिमे अंतर्गत दिनांक ०६/०३/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व बीट अधिकारी आणि अंमलदारांची बैठक घेतली. सदर बैठकीत त्यांना त्यांच्या हद्दीतील **अंमली पदार्थाचा साठा, विक्री ,किंवा वाहतुक करणारे आरोपीतांवर** तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याचे आणि कडक कारवाई करण्याचे आदेश दिले गेले. पानटपरी, पोलीस स्टेशन हद्दीतील शाळा आणि महाविद्यालयांच्या जवळच्या परीसरात अंमली पदार्थ विक्री होते किंवा कसे यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. **तसेच अवैध अंमली पदार्थाचा साठा, विक्री ,किंवा वाहतुक करणारे आरोपीतांवर कारवाई करणे कामी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी आणि अंमलदार यांचे स्वतंत्र विशेष पथक तयार करण्यात आले.**

उपविभागीय स्तरावर, नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व सहा उपविभागीय अधिकारी यांनी एनडीपीएस कायदयान्वये दाखल होणाऱ्या प्रत्येक प्रकरणावर वैयक्तिकरित्या लक्ष देवुन आणि अंमलीपदार्थ पुरवठा करणारे आणि विकणारे यांची साखळी ओळखुन, पुरवठा करणारे स्त्रोत शोधुन त्यांच्या अवैध कामावर आळा बसणेसाठी त्यांच्या वर कठोर कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

मा. पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी राबविलेल्या या विशेष मोहीमेमुळे खालील अंमलीपदार्थ विक्रेत्यांचे स्त्रोत निष्पन्न करून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

- नागपूर उपविभागात, पोलीसांनी गुप्त बातमीदाराच्या खबरेवरून आरोपी **शकील जब्बार शेख रा. टाकळघाट** याला अंमली पदार्थ विक्री करतांना एमआयडीसी पोलीस हद्दीतील टाकळघाट गावातून ताब्यात घेवुन अटक केली होती. आणि त्याच्या ताब्यात मिळुन आलेल्या अंमलीपदार्थ चा पुरवठा त्याला कोणी केला या बाबत शोध घेण्यासाठी पोलीस पथक नागपूर शहरातील धंतोली—इमामवाडा भागात पाठवण्यात आली.
- रामटेक उपविभागात अंमलीपदार्थ बाळगुन विक्री करणारे आरोपी नामे **तुळशीराम मारोतराव कठाणे रा शिवाजी वार्ड रामटेक याला रामटेक येथुन आणि स्वप्नील देविदास कोल्हे**, रा. घोगरा रोड, पारशिवणी जि. नागपुर याला पारशिवणीत अटक करण्यात आली.
- कन्हान उपविभागात, पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत अंमली पदार्थ जवळ बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे **चंदारी निनाकु सहानी, रा. शिवनगर, कांद्री कन्हान आणि हर्षल उर्फ प्रवीण दत्तराज डांगोरे रा.टेकडी ,महाराज नगर कन्हान** आणि खापरखेडा पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी नामे **सानु उर्फ केशव ओमबहादूर थापा रा चनकापुर** आणि **नितेश अशोक सिंग, रा. वार्ड क्र. ३ वलनी कॉलनी** यांना अटक करून पोलीसांनी सखोल तपास केला असता त्यांचा मध्य प्रदेशातील एका अंमलीपदार्थ पुरवठादाराशी संबंध असल्याचे तपसात उघड झाले.
- सावनेरमध्ये अशाच प्रकारे अंमलीपदार्थ विक्री करणारा **सुरेंद्र बर्वे आणि बाबू ठाकूर** यांना अटक करण्यात आली आणि त्यांनी छिंदवाडा, मध्यप्रदेशातील येथुन अंमली पदार्थ आणल्याबाबत माहीती दिली आणि एका प्रकरणातराजस्थानमधील ट्रक चालकांचाही सहभाग होता.
- काटोल उपविभागातील नरखेड पोलीस स्टेशन येथील गुन्हयातील अंमली पदार्थ पुरवठा करणारा आरोपी **नामे बाबू गुलाबराव वर्मा रा. नरखेड** याच्यावर कारवाई करण्यात आली. पुढील अंमली पदार्थ पुरवठा करणारे स्त्रोत शोधण्यासाठी तपास पथक पांढुर्णा, मध्यप्रदेश येथे पाठवण्यात आले. **तसेच नागपुर ग्रामीण जिल्हयात सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांवर सतत कारवाई करण्यात येत आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हयातील या विशेष मोहीमेअंतर्गत पोलीसांनी गुप्त सुत्रां मार्फतीने आतापर्यंत एनडीपीएस कायद्यांतर्गत १६३ आरोपीतांवर १६० गुन्हे नोंद केले आहे . आरोपीतांकडुन १३.०५९ किलो गांजा (अंमली पदार्थ ) एकूण २,२१,०६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला केले अटक

**पोलीस स्टेशन कन्हान** :— अंतर्गत दिनांक १४/०४/२५ चे २१/०० ते २१/३० वाजताचे दरम्यान मनिषा मेडीकल जवळ कन्हान ता. पारशिवनी येथे फिर्यादी नामे दुर्गा संजय संभलवार,वय ४३ वर्ष रा.धरमनगर कन्हान ता.पारशिवनी जि. नागपुर, यांचा मुलगा **जखमी नामे हरिष संजय संभलवार वय २१ वर्षे** याला आरोपी नामे **केतन मधुकर ठाकरे,वय २९ वर्ष रा. रामनगर कन्हान**,याने जुन्या वादाच्या कारणावरून धारदार हत्याराने वार करून गंभीर जखमी करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. सदर प्रकरणी फिर्यादीच्या रिपोर्ट वरून नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम १०९,भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीसांनी नमुद आरोपी नामे केतन मधुकर ठाकरे,वय २९ वर्ष रा. रामनगर ,कन्हान याला अटक केली आहे.

## क्रिकेट सामन्यावर मोबाईल वरून ऑनलाईन बेटींग/जुगार खेळणाऱ्या २ अरोपीतांवर गुन्हा नोंद

दिनांक १४/०४/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, काही इसम अवैधरित्या क्रिकेट बेटींग/जुगार खेळत व खेळवीत आहे.

कारवाई १ :— .**“मोहपा आठवडी बाजार येथील मैदान मध्ये सार्वजनीक ठिकाणी नंदकिशोर केवटे आणि नावाचा इसम लोकांकडून पैसे घेवून आज दि. १४/०४/२०२५ रोजी रात्री १९:०० वाजता पासुन खेळला जाणारा इडियन प्रिमीअर लिग २०—२०क्रिकेट चे लखनऊ सुपर जायंट विरुध्द चेन्नई सुपरकिंग या संघा दरम्यान खेळल्या जाणाऱ्या क्रिकेटच्या सामन्यावर मोबाईल फोनव्दारे बेटींग लावून जुगार खेळत आहे.”** मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी

गेले असता त्यांना नमुद आरोपी सदर क्रिकेट सामन्यावर ऑनलाईन आयडी nice7777.cofun या ॲपव्दारे त्याच्या आय डी वरुन ऑनलाईन बेटींग जुगार खेळत असल्याचे दिसुन आले आरोपी **नंदकिशोर खुशाल केवटे, वय ४५ वर्षे रा. मोहपा वार्ड क्र. ०९ ता. कळमेश्वर याच्या ताब्यातुन पंचासमक्ष रोख रक्कम १९००/— रूपये आणि एक मोबाईल फोन असा एकुण २१,९००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला.**

कारावई २ :— **मोहपा बैल बाजार येथील मैदान मध्ये सार्वजनीक ठिकाणी भुषण गणोरकर नावाचा इसम हा लोकांकडून पैसे घेवून आज दि. १४/०४/२०२५ रोजी रात्री १९:०० वाजता पासुन इडियन प्रिमीअर लिग २०—२०क्रिकेट चे लखनऊ सुपर जायंट विरुध्द चेन्नई सुपरकिंग या संघा दरम्यान खेळल्या जाणाऱ्या क्रिकेटच्या सामन्यावर मोबाईल फोनव्दारे बेटींग लावून जुगार खेळत आहे.''**मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी गेले असता त्यांना नमुद आरोपी सदर क्रिकेट सामन्यावर ऑनलाईन आयडी sky777.com या ॲपव्दारे त्याच्या आय डी वरुन ऑनलाईन बेटींग जुगार खेळत असल्याचे दिसुन आले. आरोपी नामे **भुषण लक्ष्मणराव गणोरकर वय ३२ वर्षे, रा. मोहपा वार्ड क्र. ०४ ता. कळमेश्वर याच्या ताब्यातुन रोख रक्कम ६००/— रूपये व एक मोबाईल फोन असा एकुण १५,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**दोन्ही कारवाईत एकुण ३७,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद दोन्ही आरोपीतांवर कलम १२(अ म.जु.का अन्वये पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २ स्वतंत्र गुन्हे नोंद आहे.**

# मौदा पोलीस स्टेशन तर्फे रबडीवाला वाय पॉईंट ते केसलापुर गावापर्यंत अपुर्ण काम झालेल्या सिमेंट रोड वर आपले वाहन पार्क करू नये असे नागरिकांना आवाहन

मौदा तहसिल मधील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की,रबडीवाला वाय पॉईंट ते केसलापुर गावापर्यंत अभी इंजिनीयरींग कन्स्ट्रक्शन नागपुर मार्फत सिमेंट रोड चे काम सुरू आहे. परंतु रबडीवाला वाय पॉईंट ते मौदा बसस्टॉप कडे येणारे सिमेंट रोडचे अर्धवट भागात (बाजुला) गट्टु लावण्यात आलेले नाही.त्यामुळे तहसिल कार्यालय मध्ये येणारे तसेच मार्केट मध्ये येणारे दुचाकी व चारचाकी वाहन चालक त्यांची वाहने अपुर्ण बांधकाम झालेल्या सिमेंट रोडवर अस्ताव्यस्त पार्कींग करतात.त्यामुळे त्या रत्यावर येणारे जाणारे वाहतुकीस अडथळा निर्माण होवुन एखादा मोठा अपघात होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याबाबत आज दिनांक १६/०४/२०२५ रोजी वर्तमान पत्रात बातमी प्रकाशीत झाली आहे.

पोलीस स्टेशन मौदा मार्फत अभी इंजिनीयरींग कन्स्ट्रक्शन नागपुर यांना अपुर्ण असलेले सिमेंट रोड काम त्वरीत पुर्ण करणे बाबत पत्र देण्यात आलेले असुन मौदा पोलीस स्टेशन, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या तर्फे जनतेला आवाहन करण्यात येते की, नमुद रोडचे काम पुर्ण होई पर्यंत कोणीही अपुर्ण काम झालेल्या सिमेंट रोड वर आपले वाहन पार्क करू नये. रोडचे काम पुर्ण होई पर्यंत आपली वाहने पार्कींग ची सुविधा असलेल्या ठिकाणीच उभी करावी. जेणे करून येणारे जाणारे वहतुकीस अडथळा निर्माण होवुन अपघात होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**